# बहि:स्थ विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शक सूचना

विद्यार्थ्यांनी वेळोवेळी जागरूक राहून www.unipne.ac.in या वेबसाईट वरील होमपेजवर जाऊन student corner मध्ये External Students मध्ये बहि:स्थ विभागाची माहिती पाहावी. व शैक्षणिकवर्ष २०१२-१३ या वर्षापूर्वी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी mkcl.ws/puext ही वेबसाईट पाहावी.

१. बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठीच्या सुचना www.unipune.ac.in या वेबसाईटवर student corner मधील External Students येथे प्रसिध्द केल्या जातील. परीक्षाअर्ज भरण्यासाठी व इतर सूचना प्रत्येक विद्यार्थ्यांस स्वतंत्रपणे कळवल्या जात नाहीत. वेळोवेळी ज्या नवीन सूचना येतील त्या वरीलप्रमाणेच संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील. बहि:स्थ विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३—२०१४ पासून एम.ए. व एम. कॉम. या वर्गांच्या परीक्षा 'वार्षिक' पध्दतीने व १०० गुणांची होणार आहे.

२. परीक्षाअर्ज विद्यार्थ्यांने स्वत: भरावा व त्यावर सही करुन सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनच पाठवावा.

३. बहि:स्थ विद्यार्थ्यांना फी मध्ये कोणतीही सवलत दिली जात नाही. तसेच कोणत्याही स्कॉलरशिप, फी सवलतीसाठी पत्र दिली जात नाहीत.

४. एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

५. परीक्षाअर्ज भरण्यापूर्वी आपण जो विषय निवडणार आहात तो विषय महाविद्यालयात शिकविला जातो अथवा नाही याची खात्री करुन त्याची पुस्तके बाजारात मिळतात किंवा नाही याची माहिती घेऊनच परीक्षाअर्ज भरावेत.

६. परीक्षा अर्जातील विषय बदलता येणार नाही, परीक्षाअर्जात नंतर कोणताही बदल करता येणार नाही.

७. परीक्षाअर्जावर नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक अचूक लिहावा.

८. परीक्षा केंद्र विद्यापीठाच्या सोयीने देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी फक्त गावाचे नाव select करावयाचे आहे.

९. विद्यापीठाचे गुणपत्रक हे परीक्षाअर्जावर भरलेल्या पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवले जाते. यासाठी पत्ता, अचूक भरावा गुणपत्रक मिळाले नाही याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१०.विद्यार्थ्यांने त्याला मिळालेल्या नावनोंदणी कार्डाची प्रत, हॉल तिकिट, गुणपत्रक काळजीपूर्वक जपून ठेवावे.

११. विद्यार्थ्यांने फॉर्म बरोबर चलनाद्वारे फी पाठवावी. डी.डी स्वीकारले जाणार नाहीत. डीमांड ड्राफ्ट पाठवल्यास परीक्षाअर्ज बाद केला जाईल.

१२.परीक्षाअर्ज स्पीड पोस्ट अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावा. कुरीअर द्वारा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

१३.नावनोंदणी कार्ड व हॉल तिकिट हे परीक्षेपूर्वी १५ दिवस आपणांस विद्यापीठ संकेत स्थळावरून डाऊनलोड करून घेता येईल.

१४.परीक्षेचे माध्यम मराठी किंवा इंग्रजी असेल, आपण जे माध्यम निवडले असेल त्यानुसारच परीक्षा द्यावी लागेल.

१५.परदेशी विद्यार्थ्यांना बहि:स्थ विद्यार्थी म्हणुन नावनोंदणी करता येणार नाही.

१६.खाजगी विद्यार्थी म्हणून एच.एस.सी उत्तीर्ण असल्यास बोर्डाचे स्थलांतर प्रमाणपत्र (migration) मूळ प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

१७.एकदा बहि:स्थ म्हणून प्रवेश घेतल्यास परत महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही.

१८.बहि:स्थ विद्यार्थ्यांनी टि.सी. अथवा मायग्रेशन विद्यापीठातून काढून नेल्यास त्याचा प्रवेश रद्द होतो. भविष्यात परत बहि:स्थ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करता येणार नाही. प्रत्येक शाखेची ग्राहय वर्ष (validity) ६ वर्षाची आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी सहा वर्षात बी.ए.,बी.कॉम.,एम.ए.,एम.कॉम., या परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. उत्तीर्ण न झाल्यास नावनोंदणीची मुदत संपल्यास पूर्वीचे गुण रद्द करून नवीन नावनोंदणी करून सर्व विषय द्यावे लागतील.

१९.परीक्षेस असलेल्या अभ्यासक्रमाची (syllabus) माहीती www.unipune.ac.in/external या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२०.विद्यापीठात येताना प्रत्येक वेळी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी कार्ड व गुणपत्रिकाची झेरॉक्स प्रत घेऊन यावे. त्याशिवाय माहिती सांगितली जाणार नाही.

२१.बी.ए.,बी.कॉम.,एम.ए.,व एम.कॉम या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या परीक्षेचे पासिंग सर्टिफिकेट मिळविण्यासाठी पासिंग सर्टिफिकेटचा फॉर्म व गुणपत्रकाच्या झेरॉक्स

प्रतीसह बहि:स्थ विभागात सादर करावा व पासिंग सर्टिफिकेट घेऊन जावे. ते पोस्टाने पाठवले जाणार नाही.

२२.पदवी प्रमाणपत्रासाठी (Degree Certificate) www.unipune.ac.in या वेबसाईटवर अर्ज online पध्दतीने भरून विद्यार्थी सुविधा केंद्रात जमा करावा.

२३.सर्व श्रेणीसुधार (Class Improvement) परीक्षांसाठी स्वतंत्र नावनोंदणी करणे आवश्यक आहे. जुन्या नावनोंदणीवर श्रेणीसुधार करता येणार नाही.

२४. शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ पासून प्रवेशित नविन विद्यार्थ्यांनी प्रवेशासंदर्भात अधिक माहीती साठी ०२० - २५६०१२९६, किंवा भ्रमणध्वनी. क्र. ७३८७४४१०१८ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**नावनोंदणीची मुदत पुढीलप्रमाणे राहिल.**

एफ.वाय.बी.ए. व एफ.वाय.बी.कॉम – ६ वर्ष

एस.वाय.बी.ए. व एस.वाय.बी.कॉम – ४ वर्ष

एम.ए. व एम.कॉम – ५ वर्ष

श्रेणीसुधार – २ वर्ष

बी.ए. टू बी.ए. – २ वर्ष

वरील मुदतीत नावनोंदणी केलेल्या परीक्षेस उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. मुदत संपल्यानंतर ती वाढवून दिली जाणार नाही. पुन्हा त्या परीक्षेस नव्याने प्रवेश घ्यावा लागेल पूर्वीचे गुण बाद होतील.अपूर्ण माहिती व अपूर्ण कागदपत्रे असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

(डॉ.शि.मो.आहिरे)
उपकुलसचिव
बहि:स्थ विभाग